# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-३/ प्रवेश/२०१५-१६/ ९९५५ दिनांक: ०८/०६/२०१६

प्रति,

अध्यक्ष/प्राचार्य/उपप्राचार्य/मुख्याध्यापक
पुणे. व पिंपरी चिंचवड म.न.पा क्षेत्रातील
सर्व कनिष्ठ महाविद्यालये

**विषय : इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रियेसाठी कोटा प्रत्यार्पित (Surrender) करणे व प्रवेश ऑनलाईन अपडेट करणे बाबत.**

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७ साठी ज्या कनिष्ठ महाविदयालयांना अल्पसंख्यांक आणि व्यवस्थापन कोटयातील जागा केंद्रिय ऑनलाईन प्रवेशासाठी **प्रत्यार्पित (Surrender)** करावयाच्या असतील अशा कनिष्ठ महाविदयालयांनी ऑनलाईन पध्दतीने http://pune.fyjc.org.in या संकेत स्थळावर हा कोटा प्रत्यार्पित करावा त्यासाठीची **Surrender Link** दिनांक ०८/०६/२०१६ ते १८/०६/२०१६ सायं. ५.०० वाजेपर्यंत सूरु असेल.

तसेच कोटयांतर्गत प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश संपल्यानंतर म्हणजेच दि.२२/०६/२०१६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत इन हाऊस, अल्पसंख्यांक आणि व्यवस्थापन कोटा प्रत्यार्पित करण्यासाठी **Surrender Link** सुरू असेल. त्यानंतर केंद्रिय व कोटा प्रवेशाच्या प्रत्येक फेरी अखेर केंद्रिय प्रवेश नियंत्रण समितीने प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार इन हाऊस, अल्पसंख्यांक आणि व्यवस्थापन कोटा प्रत्यार्पित **(Surrender)** करता येईल.

दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उच्च माध्यमिक विदयालय/ कनिष्ठ महाविदयालयाच्या लॉगिनमधुन कोटाप्रवेशाबाबत कार्यवाही करणे, कोटा प्रत्यार्पित करणे, कोटयांतर्गत व केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून झालेले प्रवेश तसेच रदद झालेले प्रवेश ऑनलाईन अपडेट करणे, प्रवेशा बाबतची इतर माहिती ऑनलाईन अपडेट करणे इत्यादी सर्व आवश्यक ती कार्यवाही प्राचार्य/मुख्याध्यापकांच्या लॉगिनमधुन करण्याची जबाबदारी संपूर्णतः कनिष्ठ महाविदयालयांच्या प्राचार्य / उपप्राचार्य / मुख्याध्यापक यांचेवर राहिल याची नोंद घ्यावी.

कॉलेजच्या लॉगिनमधुन झालेले प्रवेशच ग्राहय धरण्यात येतील. याव्यतिरिक्त झालेले प्रवेश नियमबाहय ठरवून ते रदद केले जातील याची सर्व प्राचार्य / उपप्राचार्य / मुख्याध्यापक व सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

MRaut 8.6.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव,
इ. ११वी केंद्रिय नियंत्रण समिती, पुणे.
तथा
सहा. शिक्षण संचालक, पुणे विभाग, पुणे.